## विषयसूची

१. पू. अनंत बाळाजी आठवले यांचा परिचय ६

२. प्रस्तुत ग्रंथाचे संकलक, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय ! ९

३. ग्रंथाचे मनोगत ११

४. ग्रंथातील काही संबोधने आणि उपाधी यांविषयीची स्पष्टीकरणे १३

५. ग्रंथातील व्याकरण आणि संकलन यांचे नियम वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे असल्याचे कारण १४

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)

**प्रकरण १. ज्ञानयोगी पू. अनंत आठवले यांची ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया १५**

१ अ. श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांनी पू. भाऊकाका यांची त्यांच्या ज्ञानप्राप्तीविषयी घेतलेली मुलाखत १५

**प्रकरण २. पू. अनंत आठवले यांनी ६४ टक्के आध्यात्मिक पातळी गाठल्यावर त्यांचा झालेला सत्कार . २७**

**प्रकरण ३. पू. अनंत आठवले ‘संत’ घोषित झाल्याचा आनंददायी सोहळा ३२**

३ अ. ‘संत’ म्हणून घोषित झाल्यावर पू. भाऊकाकांनी व्यक्त केलेले मनोगत ३२

३ आ. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांनी पू. भाऊकाका यांच्याविषयी काढलेले उद्गार ३५

**प्रकरण ४. साधकांनी पू. अनंत आठवले यांच्यावर केलेल्या कविता ५०**

**प्रकरण ५. पू. अनंत आठवले यांनी परात्पर गुरु डॉ. आठवले यांची वर्णिलेली थोरवी** ५४

५ आ. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी निर्मिलेला 'गुरुकृपायोग' उत्तम असणे ५४

५ ई. परात्पर गुरु डॉक्टरांचे असामान्य, अतुलनीय आणि सर्वव्यापक कार्य ५७

**प्रकरण ६. पू. अनंत आठवले यांचा परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्याप्रतीचा भाव** ६०

**प्रकरण ७. पू. अनंत आठवले आणि सनातनचे संत** ६२

७ इ. पू. भाऊकाका यांनी संतांची सांगितलेली वैशिष्ट्ये आणि त्यांचा संतांप्रतीचा भाव ६६

**प्रकरण ८. पू. अनंत आठवले यांनी साधकांची सांगितलेली गुणवैशिष्ट्ये** ६८

८ अ. आपापले नाव सार्थ करणाऱ्या ३ साधिकांची गुणवैशिष्ट्ये सांगून त्यांचे कौतुक करणारे पू. भाऊकाकांनी लिहिलेले पत्र ! ६८

**प्रकरण ९. पू. अनंत आठवले यांना आलेल्या अनुभूती** ७२

**प्रकरण १०. पू. अनंत आठवले यांच्या सत्संगामुळे साधिकांमध्ये झालेले पालट** ७३

**प्रकरण ११. पू. अनंत आठवले यांच्या संदर्भात साधिकांना आलेल्या अनुभूती** ७५

**प्रकरण १२. पू. अनंत आठवले यांचा गीतेविषयीचा भाव दर्शवणारा पुढील जन्माविषयीचा दृष्टीकोन** ८३

**प्रकरण १३. पू. अनंत आठवले यांच्या हस्ताक्षराच्या संदर्भातील सूक्ष्मातील प्रयोग आणि वैज्ञानिक चाचण्या** ८४

## विषयसूचीतील क्रमांक ३

## ग्रंथाचे मनोगत

‘आपल्या पवित्र भारतभूमीच्या अलौकिक वैशिष्ट्यांपैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, तिच्या कुशीत उदयास आलेली संतांची मांदियाळी ! भारतात कर्मयोगी, भक्तीयोगी, ज्ञानयोगी, ध्यानयोगी असे विविध साधनामार्गांतील अनेक संत होऊन गेले आणि असे संत आजही या भूमीत आहेत. ‘ज्ञानयोग’ हा अन्य साधनामार्गांच्या तुलनेत कठीण असल्याने ज्ञानयोगी संत तसे विरळेच असतात. अशा ज्ञानयोगी संतांपैकीच एक म्हणजे, सनातनचे संत आणि माझे ज्येष्ठ बंधू ती. पू. अनंत बाळाजी आठवले (पू. भाऊ) !

भगवंत ज्ञानस्वरूप आहे. ज्ञानाच्या उपासनेने (उदा. आध्यात्मिक ग्रंथांच्या अध्ययनाने) भगवंताला जाणण्याची उत्कट तळमळ साधकामध्ये निर्माण झाली की, भगवंतच तसे ज्ञानचक्षू साधकाला देतो. त्या ज्ञानचक्षूंच्या माध्यमातून साधकाला भगवंताचे स्वरूप जाणता येते, म्हणजे त्याला शाश्वत ज्ञानाची प्राप्ती होते. ते केवळ माहितीजन्य ज्ञान नसते, तर त्या ज्ञानाची अनुभूती घेऊन स्वतःतील ईश्वराची अनुभूती देणारे ते ज्ञान असते. हेच आत्मज्ञान होय. ज्ञानप्राप्तीच्या या मार्गात स्वतःच्या विद्वत्तेचा अहं होऊन अध्यात्मात घसरण होण्याची शक्यता अधिक असते. आजच्या कलियुगात ज्ञानमार्गाने साधना करून ईश्वराची अनुभूती घेतलेले ज्ञानयोगी हाताच्या बोटांवर मोजण्याएवढेच असतील. अशा ज्ञानमार्गाने आयुष्यभर साधना करूनही अहंकाराचा वाराही न शिवलेले, उलट सातत्याने शिकण्याच्या स्थितीत असलेले, तसेच नम्रता, इतरांप्रती आदरभाव अन् निरपेक्ष प्रेम असलेले ज्ञानयोगी पहायला मिळणे अत्यंत दुर्लभ आहे. पू. भाऊ हे असे सनातनचे पहिले ज्ञानयोगी संत आहेत !

‘पू. भाऊंसारख्या ज्ञानयोगी संतांना ज्ञान कसे मिळते ? एकदा मिळालेले ज्ञान स्थायी (टिकून) कसे रहाते ? ज्ञानप्राप्तीनंतर ज्ञानयोग्याला

स्वतःमध्ये कोणते पालट जाणवतात ? ज्ञानयोग्याला कोणत्या अनुभूती येतात ?' यांसारख्या गोष्टींचे कुतूहल ज्ञानमार्गाने साधना करणाऱ्या, तसेच अन्य साधनामार्गांनी साधना करणाऱ्यांनाही असते. प्रस्तुत ग्रंथाच्या वाचनाने हे कुतूहल शमण्यास साहाय्य होईल. पू. भाऊंच्या सन्मान सोहळ्यांच्या प्रसंगी आम्ही त्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. त्या वेळी पू. भाऊ अगदी सहजपणे बोलले, ते सर्व ज्ञानयोगाच्या भाषेतच होते. 'पू. भाऊ ज्ञानाशी किती समरस झाले आहेत', हे यावरून लक्षात आले. त्या सोहळ्यांच्या प्रसंगी त्यांनी केलेले मार्गदर्शन या ग्रंथात दिले आहे.

पू. भाऊंनी आत्मसात् केलेले ज्ञान त्यांनी आचरणात आणल्यामुळे त्यांच्यामध्ये अन्य ज्ञानयोग्यांमध्ये जाणवतो तसा रुक्षपणा जाणवत नाही. उलटपक्षी पू. भाऊंच्या हृदयात ईश्वराप्रतीचा निष्काम आणि अव्यक्त भाव अन् साधकांप्रती प्रीती असल्यामुळे त्यांच्या हृदयात ओलावा जाणवतो, तसेच वाणीमध्ये गोडवाही जाणवतो. यामुळेच पू. भाऊंच्या संपर्कात येणाऱ्या साधकांना त्यांच्याकडून पुष्कळ शिकायला मिळते आणि त्यांच्या सहवासात आनंद जाणवतो. साधकांना पू. भाऊंशी बोलल्यावर मन शांत होणे यासारख्या अनुभूतीही येतात. साधकांनी यासंदर्भात सांगितलेली अनेक सूत्रेही या ग्रंथात दिली आहेत. पू. भाऊंनी सनातनचे संत आणि साधक यांच्या सांगितलेल्या गुणवैशिष्ट्यांवरून त्यांचा संतांप्रती असलेला भाव, अल्प अहं, अंतःकरणाची निर्मळता इत्यादी गुणही दिसून येतात.

'ईश्वराने पू. भाऊंसारखे आदर्श ज्ञानयोगी संत आम्हाला दिले', याविषयी मी ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करतो. 'पू. भाऊंनी अध्यात्मशास्त्र आणि साधना यांविषयी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाचा अधिकाधिक लाभ सर्व साधकांना करून घेता येवो', अशी श्री गुरुचरणी प्रार्थनाही करतो.'

**– (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (१४.१.२०२२)** F (DW-SStAnA + PR 42Ch-SStAnA2)